माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १२२२/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. रुपम विनयकुमार जुआरे, प्रकाश आटा चक्की जवळ, दत्त मंदीर रोड, सिताबर्डी आरमोरी, ता. आरमोरी जि. गडचिरोली | कार्यालय अधिक्षक, पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर | पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १२.११.२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०५.०५.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती दिली नाही.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याची विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०४.१२.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८.१२.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : २८.०८.२०२१

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : १) आरमोरी पोलीस स्टेशन येथील पी.आय. सुर्यवंशी व ए.पी.आय. चव्हाण यांची केलेल्या चौकशी संदर्भातील अहवाल साक्षांकीत प्रत २) सदर प्रकरणात घेण्यात आलेल्या संपुर्ण बयानांच्या साक्षांकित प्रती. ३) सदर प्रकरणात पी.आय. सुर्यवंशी व ए.पी.आय. चव्हाण यांचेवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या साक्षांकित प्रती.

(५)जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.गपग/डी-६/मा.अ./रुपम विनयकुमार जुआरे/२०२१-११५, दिनांक ०७.०१.२०२२ अन्वये अपिलार्थीस प्रतिसाद दिलेला आहे.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १२.०१.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.०१.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : मागितलेली माहिती दिली नाही.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक २८.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून, दिनांक २८.०८.२०२१ रोजी या कार्यालयात सादर केलेल्या तक्रार अर्जावर अपर पोलीस अधिक्षक, गडचिरोली चौकशी करीता आहेत. सदर प्रकरणी अद्यापपर्यंत चौकशी चालु असल्याबाबत पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचेकडील पत्र क्र. डी-१०/अर्ज चौकशी /जुआरे/२०२२-४७/१४१२, दिनांक ११.०२.२०२२ अन्वये माहिती प्राप्त झालेली आहे. तसेच चौकशी पुर्ण होताच तक्रार अर्जासंदर्भातील माहिती पुरविण्यात येईल, असे आदेश पारीत केले आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

आज सुनावणी दरम्यान उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, श्री. गजेंद्र पद्माकर जढाळ यांनी नमुद केले की, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास दिनांक ०८.१२.२०२१ रोजी प्राप्त झालेला असून त्यावर दिनांक ०७.०१.२०२२ रोजी सदर प्रकरणी चौकशी सुरु असल्यामुळे माहिती देता येणार नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्यानंतर प्रथम अपिलीय आदेशानंतर सदर चौकशी अहवाल हा जून २०२२ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यामुळे आता चौकशी पुर्ण झालेली असल्यामुळे माहिती देण्यास कोणतीही अडचण नाही.

**६. निष्कर्ष —**

१. अपिलार्थी यांनी माहिती अर्ज सादर केला त्या कालावधीत चौकशी सुरु असल्यामुळे अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती देता आलेली नाही.

२. सदर प्रकरणी चौकशी पुर्ण झालेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास सहमती दर्शविली असली तरी माहिती अर्जावरुन व उपलब्ध कागदपत्रांवरुन ती चौकशी कशा संदर्भात आहे, याचा बोध होत नाही. विभागीय चौकशी किंवा गुन्हयासंदर्भात चौकशी असेल तर त्याबाबतची माहिती देण्याचे बंधन जन माहिती अधिकाऱ्यांवर नाही. सबब, प्रस्तुतचे अपील निकाली काढणे योग्य राहील.

**आदेश**

**प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.११.२०२४**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

जावक क्रमांक 251 दिनांक 13 JAN 2025